# संतोष

(निसर्गपर काव्यसंग्रह - भाग १)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**संतोष** (निसर्गपर काव्यसंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : चैत्र शु. १, गुढीपाडवा, शके १९४६
मंगळवार दि. ९ एप्रिल, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-971022-2-6

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



ज्या कविकुलगुरु कालिदासाच्या सप्तरंगी संस्कृत साहित्यातून निसर्गाची
मुक्त उधळण शब्द, अर्थ, भाव, उपमादी अलंकार, प्रतिमा, प्रसंग
यांच्या माध्यमातून झालेली आहे त्या माझ्या अत्यंत आदरस्थान
असलेल्या कवी कालिदासाच्या निसर्गाभिव्यक्तीला
हा माझा निसर्गपर काव्यसंग्रह सादर समर्पित !

# मनोगत

अनेक वर्षांच्या निसर्गाच्या सान्निध्याचा परिणाम प्रत्येकाच्या मनावर वेगवेगळ्या प्रकारे होतच असतो. पण कवीचं मन हे त्याहून निराळं असतं. निसर्गातल्या साध्या साध्या क्रिया सुद्धा कवी मनाला भुलवत असतात आणि त्याच्या मनाला फुलवतही असतात. नकळत एखादं बीज पावसाच्या धारेने रुजून यावं, त्याला अंकुर फुटावा, त्याला पालवी यावी आणि त्याचं झाडावेलीत रूपांतर व्हावं तसंच काहीसं कवितेचही होतं.

कवीच्या मनात खोल कुठेतरी बीज रूपाने असलेल्या भावना या वेगवेगळ्या प्रकारच्या निसर्गकृती पाहून फुलू लागतात, डुलू लागतात आणि डोलूही लागतात. निसर्ग हा माझा अत्यंत लाडका प्रांत. खरं तर दुःखावर फुंकर म्हणा, सुखाचा आधार म्हणा, डोळ्यांना साकार म्हणा, हा निसर्ग प्रत्येक क्षणी लोभसवाणा वाटतो.

झाडं वेली, पानं फुलं, चंद्र सूर्य, तारे आकाश, ऋतू, वेळा, क्षितिज, प्रकाश, अंधार या साऱ्या गोष्टी कवितेत उतरतात आणि त्याचे एक सुरेख काव्यचित्र तयार होते.

माझ्या मनात ठरवून एखादी कविता लिहावी असं कधीच येत नाही, तसे होतही नाही. आपसुक, सहज ती अशी अलगद उतरते आणि ती तिच्याच भावनांच्या आंदोलनात मलाही झुलवत राहते. मला वाटतं माझ्या सर्वाधिक कविता ह्या निसर्गावरच्या आहेत आणि अनेक वर्षांपासूनच जे माझं साहित्यिक व्रत आहे त्यात या निसर्गकविता सातत्याने आपलं अस्तित्व निर्माण करीत आलेल्या आहेत.

कधीतरी वाटतं की या कविता म्हणजे त्या त्या क्षणांचे माझे भावतरंगच आहेत ना ! ते केवळ माझे न राहता आता रसिकांचे होतात आणि रसिकांच्या आत्मानुभूतीला साक्षी ठरतात यातच कविता सार्थ होते. वेद आणि वेदना दोन्ही जाणल्या की कळतात, कळल्या की उमजतात, उमजल्या की आपल्या वाटतात;

निसर्ग असाच आहे. या अथांग निसर्गाच्या सौंदर्याला कवेत घेताना नकळत झालेला हा काव्यप्रवास अनेक वर्षांपासून काव्यसंग्रहाच्या रूपात यावा असे वाटत होते.

कविता उतरण्याची जशी वेळ नसते तसेच तिचे पुस्तक होण्याचेही काही सांगता येत नाही आणि अनेक वर्षांच्या या निसर्गकवितांचा हा काव्यसंग्रह रसिकांच्या ओंजळीत भरभरून देताना मला समाधान वाटते आहे.

माझ्या कवितांवर रोज प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या हजारो रसिकांच्या सदिच्छांचाच हा परिणाम आहे असे मी मानते.

पुन्हा तिथे रमणे आणि पुनश्च रसिकमनावर निसर्गाचं गारुड पाहण्यासाठी जणू हा काव्यसंग्रह उत्सुक आहे असे वाटतेय. खात्री वाटते की माझ्या अन्य काव्यसंग्रहांप्रमाणेच या काव्यसंग्रहालाही रसिकहृदय-सिंहासनाचा ठाव मिळेल.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

मराठी कवितांच्या सागरात उतरणारी, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या लेखणीने साकारलेली ही काव्य नौका रसिकांना स्वानंदाच्या महासागरात स्वच्छंद सैर करवून आणते हे खरे. काव्यसंग्रहात सार्थक भावना आणि सुंदर भाषांची विनम्र छाया साकारलेली आहे. या संग्रहातील कवितांमध्ये हे साक्षात्कार घेतले जाऊ शकतात. आत्मानुभव, तजेलदार वातावरण आणि मानवजीवनाच्या अगणित रूपांतरांचं साक्षरी रूप म्हणजे हा काव्यसंग्रह होय.

त्यांच्या भावना निसर्गाशी इतक्या एकरूप होतात की त्यांच्याच ओळीत सांगायचे तर 'फिटे पारणे दो नयनांचे' आणि वाचताना फिटे पारणे रसिक जन्माचे असेच वाटते. त्यांना निसर्गाची भूल पडलीय की सृष्टीच त्यांच्या काव्यात भुलून गेलीय असे वाटू लागते. सतत काव्यलेखनाचं व्रत जे या कवयित्रीने घेतलंय ते निरंतर अखंडितपणे सुरू आहे हे विशेष उल्लेखनीय.

अनुवाद आणि साहित्यिक क्षेत्रात डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी आपला उत्तम ठसा निर्माण केला आहे.

त्यांच्या कवितांखालची दिनांक – वेळेची नोंद म्हणजे काळावर कोरलेल्या काव्य शलाकाच जणू !

निसर्गाच्या आशापाशांच्या मर्मस्पर्शी क्षणांमुळे हा काव्यसंग्रह सर्वांगीण आणि आत्मिक आवृत्तीत जपून ठेवण्यासारखा आहे. हा काव्यसंग्रह म्हणजे एक सौंदर्यपूर्ण साहित्यिक अनुभव असून कवयित्रीच्या काव्यकलेचे सकारात्मक प्रमाण आहे, ज्यामुळे अशी प्रेरणादायक आणि सार्थक अनुभूती प्राप्त होत जाते.

महाराष्ट्राला लाभलेल्या त्या एक साहित्यसागरतील अद्वितीय रत्न आहेत असेच म्हणावे लागेल. त्यांच्या संस्कृत, मराठी, हिंदीतील विपुल साहित्याने सारस्वतांची तृषातृप्ती सदैव होत राहील यात शंकाच नाही.

त्यांच्या उज्ज्वल काव्य यात्रेसाठी माझ्या अनंत शुभेच्छा ।

**नीलेश र. गटणे,**
भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

# अनुक्रमणिका


१) चित्रस्वर हे रंगती ... ११
२) पिंपळ पानी मन उतरावे ... १२
३) स्मृती देखण्या या ... १३
४) चांदव्याच्या सौंदर्याला मन उधाण भेटते ... १४
५) तीट राधेचे मोहन काजळ ... १५
६) फिटे पारणे दो नयनांचे ... १६
७) थेंबराण्या पावसाच्या ... १७
८) जरा पाहू दे ती सुंदरता ... १८
९) झाड ... १९
१०) हिरवं तारुण्य ... २०
११) गोदा बहरून येवो ... २१
१२) जगण्याला मेजवानी ... २२
१३) माझी आस तुझ्या उरी ... २३
१४) सुखा बिलगते पाती ... २४
१५) हिरवी गाणी हिरव्या ऋतूची ... २५
१६) कवडसा ... २६
१७) मनी सणाचा गोडवा ... २७
१८) नवपल्लव निवडुंगी हसावे.. २८
१९) पाचू फुलुनिया आले ... २९
२०) रोज पथिक मी नवा नवा ... ३०
२१) रम्य देखणे असे लावण्य टिपू सर्वदा ... ३१
२२) चोचीतले गाणे गाई ... ३२
२३) रोज सांजेला गगनी चाले ... ३३
२४) पाचू सुरावळ उमटून जावी ... ३४
२५) प्रीत धाराप्रवाह ... ३५
२६) इतक्या रंगांच्या मोही ... ३६
२७) अशी निसर्ग किमया ... ३७
२८) एक साधं झाड कधी होऊ देत ... ३८
२९) सारे सारे रंग खुणावती ... ३९
३०) सावली कर माऊलीचा ... ४०
३१) दोडका रे दोडका ... ४१
३२) रंग रंग त्याचाच ... ४२
३३) असेच रहावे चित्र देखणे ... ४३
३४) सृष्टी सौंदर्याची खाण ... ४४
३५) कोण ना रमे ... ४५
३६) फूल की ती भूल मी ... ४६
३७) प्रीतकुसुमांचा सडा ... ४७
३८) त्या अंधारातून जागते ... ४८
३९) रास रंगून हसे श्रीरंग ... ४९
४०) असे असावे घरकुल आपुले ... ५०
४१) घ्यावी सोनेरी सकाळ ... ५१
४२) असे मीलन देखणे ... ५२
४३) दान मिळेल नभाचे ... ५३

४४) आल्हादाचा रंग गुलाबी... ५४
४५) रंग आपुले स्वच्छंद कलंदर ... ५५
४६) सोडून द्यावे खुले जरा मन ... ५६
४७) तरी रोज चित्र न्यारे ... ५७
४८) हिरवा उत्साह सांडला ... ५८
४९) चांदणीची कहाणी ... ५९
५०) रानोमाळी फुलल्या ओळी ... ६०
५१) आठवणींच्या पिंपळगाठी. ६१
५२) जगण्या उभारी देई ... ६२
५३) स्वच्छंदाचे रसाळे ... ६३
५४) तुझ्या श्याम नीलरंगी ... ६४
५५) बहावा ... ६५
५६) ठेवा सुंदर काजव्यांचा ... ६६
५७) अहा बाहेरी ती वनराई ... ६७
५८) सोन सकाळी सकाळी ... ६८
५९) ही उषा रमवून जाते ... ६९
६०) जलधारा झेलून हाती ... ७०
६१) किती शांत सुंदर ... ७१
६२) नव्या नव्याने खुशीत थोडे ... ७२
६३) तरी आस मज मनी उरावी ... ७३
६४) घरटे छोटे असे एकटे ... ७४
६५) मनास उंचावरून झोकता ... ७५
६६) सारे कासार शोभते ... ७६
६७) मनसोक्त फुलून घ्या ... ७७
६८) रूप सापडे नित्य नवे ... ७८
६९) ऋतू खुलावे असे सोहळे ... ७९
७०) जरा रुजवावे स्वतःला ... ८०
७१) स्मरत रहावे देखावे ... ८१
७२) ऋतुराज रंगताना ... ८२
७३) सांज मोहरून गेली ... ८३
७४) क्षण उजळून जाती ... ८४
७५) काही उमलत्या कळ्या... ८५
७६) शाश्वत इथले आहे का हे. ८६
७७) अशा ऋतूची कर आळवणी ... ८७
७८) कुठला शिक्षक असेल तो की ... ८८
७९) कोरडा ठक्क श्रावण ... ८९
८०) आस मधुरल्या क्षणांची .. ९०



## (१)
## चित्रस्वर हे रंगती

भास हे आभास सुंदर
सावल्यांच्या बंदिशी
तो अडकतो दिनमणीही
स्वेच्छेने जणू त्या निशी

संध्यासमयी परत निघता
कोणी वाजवली गिटार
छेडिली अन काळजाची
कोणी प्रीतीने ही तार

हाती ना येतो कधी हा
दिड.मणी सदा व्यस्तसा
आज झाला बंदीवासी
समय जरी तो अस्ताचा

वृक्षराजी जलतीरावर
सावल्यांची सोबत
झडती सप्तही सूर येथे
संध्याकालीन नौबत

क्षितिजंही उतरून आले
मध्यभागी मैफिल
सूर्य अतिथी या सभेचा
कोणी नाही गाफिल

ऐकुनी ते गाण सुंदर
रेंगाळे थोडी निशा
चांदवाही थबकला की
विसरला स्थाना दिशा

जलतरंगांनी दिलेली
साथ सोबत एरवी
छान झाली सांगताही
सूर्य गायी भैरवी

जादू ही संगीत ऐशी
सारे विसरून दंगती
अन निसर्गातून दिगंती
चित्रस्वर हे रंगती

दि.२०/०४/२१
सकाळी ०८.१४ वा.




## (२)
## पिंपळ पानी मन उतरावे

एका पिंपळपानाचे
रंग किती अलवार
जणू कोवलाई ही झाली
अलगद त्यावर स्वार

रंग केशरी पिवळे पोपटी
काही वाढती काही धाकुटी
काही लाल तांबडे रांगडे
काही बदामी काही लांबडे

हिरवट पिवळे सोनकोवळे
काही गुलाबी अतरंगी
नक्षी सारखी कोरून झाली
तीही भासते सतरंगी

देठ कोवळे शेंडे नाजूक
वास नवा नवलाई साजूक
स्पर्श तलम रेशमी मल्मली
पिंपळपाने गर्दी केली

काय सांगती कवळी पाने
मनास ठेवा तलम कोवळे
नका जरठ त्या होऊ द्यावे
रंग मनाचे फुलतील सारे

पिंपळ पानी मन उतरावे
भाववर्ण ते खुलून यावे
आधाराचा तरुवर ज्ञानी
अतरंगांची शोभा मोहे

जरठ राठ मन होऊ न द्यावे
रंग त्यावरी मचकट सारे
अंतरंग जपताच कोवळे
मनात सारे जपता येते

दि.१८/०४/२१
रात्री १२.२१ वा.




## (३)
## स्मृती देखण्या या

येशील चांदव्या रे
मेघात तू लपुनी
पाहशील हळूच ऐसे
प्रेमाने झाकाळुनी

तुला पाहण्याला
ही जागीच झाडे
फुलांचे हे गुच्छ
हाती ताजेतवाणे

खिडकीत माझी
प्रिया एकली ही
निरखंत तुजला
अशी थांबलेली

शीतल तुझी ही
किरणे दिलासी
तुझ्या चांदण्यातील
या रात्री विलासी

तुला पाहुनी मीही
व्याकुळ होतो
प्रियाभेटीला
खेचखेचून जातो

अशा मीलनाच्या
स्मृती देखण्या या
पुनव चांदण्यावर
पुन्हा रेखण्या ह्या

दि.२२/०५/२१
रात्री ११.४६ वा.



## (४)
## चांदव्याच्या सौंदर्याला
## मन उधाण भेटते

लागे ग्रहण तरीही किती मोहक सुंदर
खळाळती लाटा अन उधाणला समुंदर
तेज झाकोळतं जरी अवचित काही काळ
पुन्हा तुझ्या चांदण्याची बरसात ही सुकाळ

तूही माखलेला असा माखतोस आम्हालाही
तुझ्या राज्यातून होई  हद्दपार काहिलीही
तुझ्यातच चांदण्या नि रोहिणीही गढलेली
तुला पाहताच प्रीत कासाविशी वाढलेली

उतू जातोस तू असा चांदण्याच्याअमृताने
उतावीळ मन इथं राजसाच्या आठवाने
तीर मारतो मदन रती घायाळ इथली
तुझ्या सहवासी मज स्वप्नं चंदेरी लाभली

पुनवेची रात अशी सरू नये ती कधीच
किती बोलके आकाश आज गुंगले उगीच
सुंदराला शाप तरी तसूभर ना घटते
चांदव्याच्या सौंदर्याला मन उधाण भेटते

दि.२६/०५/२१
रात्री १०.५७ वा.



## (५)
## तीट राधेचे मोहन काजळ

झुळझुळझुळझुळ वाहतो झरा
सरसरसरसर किरणे पसरा
झाडांच्या रेघारेघातून
सोनतोरणे चढवावी जरा

पाहत होती वाट पहाट
भरभरभर सुरू जगती रहाट
उठून जलाने दिली अंगडाई
सळसळसळ पाने सळसळली

धुंद हवेचा सरसरसर सरवा
कुंद हवेतून सुरभित मरवा
खळखळखळ पाण्याचे गाणे
मस्तीमध्ये वाहो तराणे

पानापानांवरती कुजबुज
किलबिलकिलबिल विहंगमी गुज
हलचल हलचल मनात चंचल
लगबगलगबग युवती करतील

अवखळ अवखळ यमुनेचे जळ
तीट राधेचे मोहन काजळ
सोनपिवळी ही गोरीगोजिरी
राधा हरिहृदयात साजिरी

दि.०६/०७/२१
सकाळी ०९.०३ वा



## (६)
## फिटे पारणे दो नयनांचे

दवबिंदूंची माळ साजिरी
सृष्टीराणीच्या कंठी
नक्षीदार किती कुसर रेखिली
जडवणूक हिरेबंदी

नाही ओवला धागा कुठला
कुठून सांधले मोती
चमचम लुकलूक तेज पाजळे
क्षणात नभ ये हाती

रत्नहार जडविला सुरेखी
कारागिरी देखणी
असा दागिना घटकाभरी हा
पाहून घ्या लोचनी

फिटे पारणे दो नयनांचे
कर्त्याची स्वाक्षरी
रत्नपारखी कोण कोठला
अजब घडली ही सरी

वर्षा ऋतूच्या खुणा बोलक्या
लावण्याच्या ओळी
असा सोहळा टिपून घ्यावा
भाग्य उजळता भाळी

दि.०९ /०७/२१
सकाळी ०७.५३ वा.




## (७)
## थेंबराण्या पावसाच्या

चिंब पावसाच्या घरी
सारं ओलं ओलित्याचं
वर आवाज गगनी
चाले दळण जात्याचं

पात्या घरघर नभी
घासघासुनी फिरती
वीजबाई हो तोऱ्यात
अशी मधे चमकती

सरी दळण पडतं
शुभ्र पाणी ते सांडतं
आता बुजलेलं बीज
खेळ उगवी मांडतं

कोण म्हातारी काळाची
धनधान्य सर्गाची
सोडी गठडी पाण्याची
झुंज काळेत्या ढगांची

घ्याना भरून भरून
गोण्या गारा पावसाच्या
आत मनात साठवा
थेंबराण्या पावसाच्या

दि.१३/०७/२१
दुपारी ०४.१७ वा.



## (८)
## जरा पाहू दे ती सुंदरता

कुणी उभारल्या वृक्ष कमानी
स्वर्गंगेची  धारा
निळ्या आकाशी मार्ग चालला
शुभ पुण्याच्या द्वारा

असे वाटते मंदाकिनीच्या
जळात पुण्य फळावे
जितेपणी मज स्वर्गसुखाचे
भाग्य असे हे मिळावे

मी मग होऊन सूक्ष्मदेहाने
सहजी कुठे भ्रमावे
कधी अप्सरा होऊन पदतली
नंदनवन रमवावे

कल्पवृक्षाच्या खाली बैसून
मागून सारे घ्यावे
मनात त्याचे रोप इवलुसे
मीही रुजवून द्यावे

इथे आणल्या पारिजातका
मुळातून मी पहावे
आणि फुलांच्या किती करंड्या
गंधातून नहावे

अशी एकदा सैर घडू दे
मी सजीव असताना
काय कळे मज स्वर्ग दिला तरी
जीव गाठी नसताना

जरा पाहू दे ती सुंदरता
मला मोहू दे तरी
तुझ्या रचनेच्या प्रेमामध्ये
मला गाहू दे तरी

दि.१३/०७/२१
सायं ०५.५३ वा.




## (९)
## झाड

झाड पाण्यात
झाड मनात
झाड गगनी
झाड रानात

झाड फुलांचं
झाड फळांचं
झाड नुसत्या
दाट छायेचं

झाड डोलतं
झाड डुलतं
झाड वाचू या
असं बोलकं

झाड बीजाळ
झाड खट्याळ
झाड वेल्हाळ
झाड रसाळ

झाड जगणं
झाड वागणं
झाड सांगणं
झाड वाढवणं

झाड देणं
झाड घेणं
असा वसा
सांभाळणं

दि.१२/०२/२१
सकाळी ७.२३ वा.



## (१०)
## हिरवं तारुण्य

रान बहरून आलं
पीक डवरून आलं
हिरवं तारुण्य लेऊन
रानामंदी गुज गेलं

तिची मलमल मऊ
हात हळुवार लाऊ
रेशमाच्या शालूमंदी
वधू वसुंधरा पाहू

कशी सजली धजली
बीज उदरी रुजली
कवळ्या जावळाची बाळं
तिच्या कुशीत निजली

खोडकर अवखळ
पात्या करी सळसळ
वाऱ्यासंगे उडतील
नवे पिक परिमळ

एक वाट की धाकुली
हिरवाईनं सजली
लाज लाजेनं लाजली
दवातून भिजलेली

असं पिरतीचं रान
फुलू दे ना रं शिवार
सदा हिरवळ राहो
राहो तुझीच बहार

मलमल मीही राजा
तुला सुखावण्या झुरे
रेशमाच्या नात्यासाठी
मन दुलई पांघरे

दि.१७/०७/२१
रात्री १०.३७ वा.



## (११)
## गोदा बहरून येवो

रंग गुलाबी अबोली
आभाळाचे पांघरून
लाली गाली उतरली
पाणी गेले की रंगून

अशी सकाळ फुटावी
गोदामाई ती नटावी
शुद्ध निर्मळ जळात
एक लहर उठावी

संत ऋषी मुनी जन
प्रभातीचे मंत्रगाण
सूर्यनारायण देवा
अर्घ्य तुला ते प्रदान

काठी वृक्ष लवलेले
जळी नभ टेकलेले
गंगा दक्षिणेची वाहे
क्षितिजही झुकलेले

उतरून देव सारे
जल प्राशण्यास आले
तृप्त होती जीव मग
तिच्या मायेनीच ओले

तिचा वाहू दे प्रवाह
नित भरला जलौघ
गोदा बहरून येवो
धरेवर शुभ्र रेघ

दि.१८/०७/२१
रात्री १२.१४ वा.



(१२)
## जगण्याला मेजवानी

तरारलं रान सारं
पात्या लवलवणाऱ्या
अंगी रेशीम सांडली
राण्या हुळहुळणाऱ्या

रंग मनात साठवा
गोड आठवा आठवा
झोपडीत माझ्या अशा
प्रीत गाण्याला पाठवा

गर्द हिरवी ही झाडी
पाठी पाठराखी डोले
रंगसोहळे सगळे
हिरवाईचे दंगले

वारा गंध हुंगणारा
द्वाड पदराशी खेळे
लाडलाडात चालले
त्याचे अवखळ चाळे

हवा ताजी नि तवानी
तरतरी तनी मनी
उगा टेकता जरासे
जगण्याला मेजवानी

नको कसली दौलत
सारं उधळून द्यावं
सृष्टिसंगं रमताना
फुल मनी उमलावं

दि.२५/०७/२१
सकाळी ०८.३२ वा.



## (१३)
## माझी आस तुझ्या उरी

काय बोलतात येथे
सांजवेळी या नारळी
नभ झाकोळले थोडे
थोडी पसरे काजळी

दिनभर आकाशाशी
वाऱ्यासवे झुंजताना
पान हेलकावे खाती
गीत कानी गुंजताना

आता गुलुगुलू काही
तुझ्या माझ्या मनातले
ऐक हळूच सांगते
राजा गुज रे आतले

जीव जडला जडला
तुझा माझा असा काही
प्रीत सांभाळ ना सख्या
तिला तोड काही नाही

आज कोणी नाही जागे
जाग्या भावना आपुल्या
जन्म परिमळ देते
जप प्रेमास या माझ्या

खोल सखोल रुजू दे
माझी आस तुझ्या उरी
मला झुलव राजसा
तुझ्या प्रीतीच्या लहरी

दि.२५/०७/२१
सकाळी ०९.५० वा.



## (१४)
## सुखा बिलगते पाती

असेच धरते सावरून मी
सुख बिंदूला वेडी
आयुष्याच्या उतरणपाती
थबकून काही नाती

कधी येऊनि सर सुखाची
बरसून थोडी जाते
ग्रीष्म पोळका जाळी तनमन
होरपळून मी जाते

गळती झडती जीवनपाती
सुकून जाती पाने
दुःख केवढे कठोर निर्दयी
करपून टाकिले याने

ऋतू बदलता बदले सारे
शीतल वारा होई
आल्हादाची फुंकर घालून
जगण्या कोंब हा येई

आशा वाढे भरभर भरभर
रूप नवाळी सजते
दवबिंदूंची अशी मालिका
अंगावरती रुजते

रुजली नाती दव हे गाती
शहारलेल्या राती
पहाट येते दवास घेते
सुखा बिलगते पाती

दि.२७/०७/२१
पहाटे ०४.१३ वा.




## (१५)
## हिरवी गाणी हिरव्या ऋतूची

झुलती झाडावरील झोके
सरोवराचे चुकतील ठोके
परी गोजिरी अधांतरी अन्
रम्य चालती ते हिंदोळे

मत्स्य राणुल्या होती गोळा
रंगीबेरंगी चंचल चाळा
तिच्यासवे ते बोलून घेण्या
आटापिटा बघ त्यांचा सगळा

वरून वाकल्या फांद्या कणखर
पालवी नाजूक हिरवी सुंदर
अंगावरती झोम्बु देती
जिवास झुलवीत अंबरी झुंबर

तिकडून आली लाट धुक्याची
शिरशिर शिरवे गगनावरती
हिरव्या गगनी सरोवराची
हिरवी गाणी हिरव्या ऋतूची

पाऊसधारा श्रावण प्यारा
मनास देई सदा दिलासा
कुठेतरी मन रमून जाते
कधी लाभता असा किनारा

दि.२७/०७/२१
रात्री ११.४१ वा.



## (१६)
## कवडसा

घरे बंद ही छतेही बंद
सिमेंटची पक्की पाबंद
जरा इवलुसा असा झरोका
नाही येईल कुठून कवडसा

ते छत होते मैत्रीपूर्ण
काट्याकुट्यांचे लाकडी जीर्ण
तरी त्यातुनी रोज सकाळी
डोकवून जातसंत ती किरणं

अशा प्रकाशा दोरीसंगे
लटकून गेले रम्य बालपण
धुळीकणांना पकडत होतो
लहान मोठे सारे आपण

अंधाराच्या छाताडावर
नाचून जाई रोज कवडसा
त्याच्या येण्यासवे आशेचा
एक किरणंही सापडलेला

खेळ चालले भू सूर्याचे
तो येई फट छोटी सांधून
घर साधे अन मनही मोकळे
गेले आता मनही बांधून

आता न येतो सूर्य अंगणी
घरात त्याला प्रवेश नाही
नाही किरणे तेजंही नाही
कुठे कवडसे गेले पाही

चला घरांना आणि छतांना
ठेऊ मोकळे थोड्या सांदी
मनास करूया पुन्हा खुले अन
लुटून घ्यावी कवडसी चांदणी

पुन्हा मोजूया कण धुळीचे
मनास करूया स्वच्छ चांगले
पुन्हा जगाया सोडू मोकळे
पहा कवडशा झुले बांधले

दि.१९/०४/२१
दुपारी १२.४५ वा.



## (१७)
## मनी सणाचा गोडवा

जीव इवला इवला
जीव कोवळा कोवळा
अंकुरल्या बीजातून
कोंब ताजा डोकावला

त्याची नाजूकशी पाती
डोळे घट्ट झाकलेली
नवं जग दडलेली
वर रूपाची नवेली

आली ताकद कुठून
जीव अणु एवढाच
दव अंगी झेललेला
त्याच्या जिवा एवढाच

अशी शक्ती आत आहे
झाड सामावून जाये
मोती जगण्यातले हे
दव समजून घ्यावे

व्हावे चिंब ओले त्यात
प्रीत प्रेरणा ही आत
भरू विश्वास इतुका
करू संकटी या मात

नवे वर्ष नवा जन्म
नवे रूप नवे स्वप्नं
पुन्हा नव्याने कोवळ्या
राहू पातीमध्ये दंग

नवे अंकुर फुटू दे
मनी सणाचा गोडवा
सारे ऐश्वर्य दवाचे
तुम्हा देऊ दे पाडवा

दि.१३/०४/२१
सकाळी ११.२१ वा.
वर्षप्रतिपदा, गुढी पाडवा



(१८)
**नवपल्लव निवडुंगी हसावे**

दऱ्या कपाऱ्या डोंगरातुनी
रुक्ष खडक हा हिरवा होई
निवडुंगाचा बहर कंटकी
पात्या उमलून बरवा होई

नाही पाणी नाही कोणी
नाही पाहणे कौतुक नाही
दुस्वासचि हा नशिबी यांच्या
कुणा पसंती उतरणे नाही

तरी कधी ना हरतो तोही
दगडातून जीव तरतो तोही
काट्यांनाही फुलवून अंगी
दंग असा निवडुंग हा होई

कुणी किती जरी अव्हेरले तरी
काट्यांची ही दोस्ती मिरवी
आशावादी निवडुंग हा
ऋतू वसंता नजिकची फिरवी

कुणा कळावे सौंदर्याचे
असे देखणे रूप दिसावे
किती बोचऱ्या काट्यांमधुनी
नवपल्लव निवडुंगी हसावे

दि.१२/०८/२१
रात्री ०९.४८ वा.



## (१९)
## पाचू फुलुनिया आले

असे झाकले धुक्यात
प्रेम पांघरून सारे
दिसतात ना दिसती
डोंगराची ही शिखरे

धरा पाणी पाणी झाली
लाज अंगी सांडियली
तिच्या प्रीत मोहराने
हिरवी स्वप्नं मांडियली

हिरव्या रेशमी शालूत
नवरी वसुधा नटली
हौस डोंगर राजाची
तिला पाहून फिटली

वर सनईचे सूर
आकाशात मेघ गाती
आज जुळून येतील
जीवापाडची ही नाती

तोही झुकला झुकला
ताठ कणा डोंगराचा
अशी सुंदरी जीवनी
तिचा मान सांभाळावा

कसा भरून आलाय
सरीतून बोलणार
तिच्या स्पर्शाने खुलून
तिच्या संगे चालणार

झाली सप्तपदी आता
तीही मोहरून गेली
थेंब अक्षदा पडल्या
ऋतू आवरून आली

निज नाही या डोळ्यांना
दोघे गुंग दंग झाले
शिवारात डोंगराचे
पाचू फुलुनिया आले

दि.११/०८/२१
रात्री ०९.१० वा.



## (२०)
## रोज पथिक मी नवा नवा

कंच हिरवाईमधल्या गावी
श्वास मोकळे घ्यावे
डोंगरराजी त्या वनरागी
सारे साठवून घ्यावे

हिरव्या दुलयीत गुडुप नगांनी
धुकं चादर पांघरली
पायाखाली रेशीम हिरवी
मऊशार अंथरली

घरे उजळली उजळल्या दिशा
उन्हेही उजळून गेली
क्षणात मरगळलेल्या जीवनी
एक प्रेरणा आली

निसर्ग घर की घरी निसर्ग हा
सुंदर प्रश्न पडावा
रोज दिवस इथला मनमोही
रोज सुकाळ घडावा

कधी न संपो इथला वास अन
सुवास परिसरी यावा
रोज पथिक मी नवा नवा
अन नवा प्रवासही व्हावा

दि.२०/११/२०२२
रात्री ०८.०२ वा.




**(२१)**

**रम्य देखणे असे**
**लावण्य टिपू सर्वदा**

सर्ग किती देखणा निसर्ग स्वर्ग भासतो
कणकणात सृष्टीच्या देव जणू हासतो

मन असेल जर हरेभरे सदाच हिंडणे
गम्मत ती आगळी चित्र मनी मांडणे

दव वेचून घेऊ की घेऊ उन्हे ओंजळी
हिरवाई भरलेली भरू तेज अंजली

एक तार तारते आसमंती पेलते
मजसवे भरलेल्या मज मनास झेलते

या इथून त्या तिथे मी पोचणे सरसरू
कवटाळू झाडांना सुमनांना पसरू

झोकून देऊन पाहू झेलतो तो आपसुक
हिंदोळे हळुवार हवेचेही गुपचूप

जीव रमतो निसर्गाच्या कुशीतच सदा
रम्य देखणे असे लावण्य टिपू  सर्वदा

दि,२१/११/२०२२
सकाळी १०.०९ वा.



## (२२)
## चोचीतले गाणे गाई

चिमणचोचीतून झेलू या चल
ओघळणारा दवबिंदू
पानावरल्या हिरवाईला
अलगद घेऊ चल चुंबु

उन्हे कोवळी अंगावरती
सोने सांडून जाताना
घरट्या बाहेर नका पडू बरे
आई सांगून जाताना

इथेच थांबू सोबत सोबत
सुंदर मोती दव सांडे
चोचीमध्ये मोती चारा
घालीन ऐसें आई सांगे

गोड गोड हे थंड थंडुले
कसे लागतील चव पाहू
थोडे पिऊ या थोडे झेलून
अंगावरती चल न्हाऊ

दवही पिल्लू या पानांचे
सोडत नाही त्या आई
मैत्री करूया झिम्मा खेळू
चोचीतले गाणे गाई

दि.२२/११/२०२२
सकाळी १०.०१ वा.




## (२३)
## रोज सांजेला गगनी चाले

अहा अहा हे जळात केशर
नभी निळाई भाळून गेली
सांजतीरावर डुबतानाही
सुंदर किमया रवीने केली

लाटांनी हो गिरक्या घेऊन
एक रांगोळी पाणी काढली
नीरामध्ये रंग तरंगे
क्षितिजाचीही शोभा वाढली

मग उभे जे झाड सरळ ते
प्रतिबिंबाने अवचित झुकले
कुणा चित्रकाराची तबकडी
रंग मिसळुनी रंगच हुकले

पैलतीरावर काळी झाडी
गुडुप होईल क्षणात सारी
भरभर नेसून चंद्रकळा मग
खुलून जाईल निशा ही प्यारी

रोज सांजेला गगनी चाले
उत्सव सुंदर रंग सुन्यारा
वर जो बसला गाली हसला
उघडून देतो रम्य पिटारा

दि.०१/१२/२०२२
सकाळी ०८.२३ वा.



## (२४)
## पाचू सुरावळ उमटून जावी

हिरवाईची हिरवी नक्षी
हिरवी फांदी हिरवा पक्षी
हिरव्या पानापानातुनही
हिरवी बरवी सृष्टी साक्षी

हिरव्या हिरव्या गवतामध्ये
हिरवी दुलई लपून बसते
हिरव्या स्पर्शातील साजणा
रोमांचित हरिताली हसते

हिरव्या नदीचे हिरवे वाहणे
हिरव्या प्रतिबिंबास पाहणे
हिरव्या राणीच्या लज्जेसाठी
हिरवाईच्या डोही गाहणे

हिरवा गारवा भिरभिर फिरतो
मरगळ थकवा काहीच नुरतो
हिरवी स्वप्ने नीजही हिरवी
हिरवा मरवा श्वासी उरतो

म्हणून वाटते घडून यावी
हिरवी भ्रमंती हिरव्या गावी
एक मनाची तार छेडिता
पाचू सुरावळ उमटून जावी

दि.०६/१२/२०२२
सकाळी ०८.३२ वा.



## (२५)
## प्रीत धाराप्रवाह

सळसळ धबधब असा कोसळे
किती जन्माची आस
स्वर्गामधली जलधारा की
सुख फेसळते भास

कसली ओढ ही उगाच आतून
तुला भेटण्याची
असाच वाहत येतो निर्झर
नशा वाहण्याची

उंचावरुनी झोकून देऊन
सोडून जलदेहा
मीलन धरेशी नाही आजचे
मनीषा ही नेहा

असाच उसळून येतो हृदयी
सागर फेसाळून
तुला भेटण्या जीव हा आतुर
भावना ये घुसळून

कणकण अंतर्मनही  भिजते
उतावीळ परिवाह
अशी भेट नित आवेगाची
प्रीत धाराप्रवाह

दि.०७/१२/२०२२
सकाळी ०७.५६ वा.



**(२६)**

**इतक्या रंगांच्या मोही**

निसर्गे उधळली ही किमया तुफानी
चटकदार रंगांची दुनिया सुहानी

कुठून आणिले रंग त्याने गडदसे
तो राणी गुलाबी निळे काळे हिरवे

पुन्हा ना छटा ऐशा कोणास जमती
किती ह्या पिढ्या संगतीतून रमती

अशी  निर्मिती साकारते अनोखी
कुंठित सारी आपसुक बुद्धी

पाहून मन ना कधीही भरे हे
पुन्हा पुन्हा न्याहाळून पाहण्या खरे हे

एकाऽऽच रंगात मन रंगते ना
इतक्या रंगांच्या मोही मन तरंगते ना

दि.३०/०१/२०२३
सकाळी ०८.३८ वा.



**(२७)**

## अशी निसर्ग किमया

चिमुकलासा गोडुला
पक्षी इवलुसा बसे
फांदी डोलू लागताच
अंकुरले पान हसे

मग वरून पाहत
दिनकर  मजा घेई
पानं उन्हांना झेलती
नक्षी सावलीची होई

त्याचा रंग हिरवास
पिवळा सोनेरी मुकुट
डोळे गुंजा भरलेले
चित्र चितारे निमूट

वेलबुट्टीची रांगोळी
पाठीवर काढलेली
त्याला पत्ताही तो नाही
शोभा किती वाढलेली

अशी निसर्ग किमया
क्षणोक्षणी घडते ना
अगणित रूपसज्जा
चराचरी जडते ना

दि.१०/१२/२०२२
रात्री.११.२८ वा.



## (२८)
## एक साधं झाड कधी होऊ देत

बहर पालवीचे नेहमीच
सुखावणारे असतात
काही पल्लव्या
फुला फळांनी मातृत्व मिरवतात
तर काही नुसत्याच
आपल्याच स्वरूपात रममाण होणाऱ्या
असतात

त्यांना नाही म्हणत कोणी वांझ
निफळीक निपुष्पीक वगैरे वगैरे

खरं तर त्यांच्या गावीही नसते असे काही
दुस्वासाचे विचार गाठोडे

त्यांना नवीनतेने नेहमीच स्वतः ला
सजवायला धजवायला आवडते
झाडाला पानांनी डवरायला आवडते

पान गळती येते तेव्हा पिवळे पिवळे
आसवं ढाळतंच की ते झाड
किती तरी अगणित
पण पुन्हा तेवढ्याच किंबहुना
त्याहूनही अधिक अंकुरांनी
लेकुरवाळं होऊन जातं ते झाड

अस्तित्त्व तेव्हाच संपतं जेव्हा
आपणच आपला दुस्वास करू लागतो
काय नाही हे पाहत बसतो
अन
काय आहे हे मात्र लक्षातच घेत नाही

एवढी पालवी फुटूनही
जगण्याला भुंडं समजत रडत राहतो
वेड्यागत
शिकावं नाही असं थोडं
उगाच अशा आपल्याच मस्तीत
हिरव्यागार राहणाऱ्या झाडाकडून!

बहर आपलेच,जाणिवा आपल्याच
मानणं आपलंच
उणिवा झडू देत, भ्रम सारे पडू देत
देवा मला एक साधं झाड कधी होऊ
देत....

दि.२१/१२/२०२२
सकाळी ०५.५४ वा.



## (२९)
## सारे सारे रंग खुणावती

रंग रंगल्या धरतीवरती
आज फुलांचा मेळा
कुसुम कामिनी नाजुक कवळी
स्पर्श तलम करू गोळा

फिक्या गडद रंगांची उधळण
चित्र देखणे लोभस
वर निळाई पांघरून किती
सुंदर नभ ही मोहक

कोणता पडे पसंत रंग हो
सांगणे कठीण जाईल
सारे सारे वर्ण मिसळुनी
सुवर्ण दालन होईल

रंग मलमली रंग मखमली
रंग फूलपाखरे
रंग लेऊनी आली धरणी
तिचे रंगभरे नखरे

सारे सारे रंग खुणावती
वाटे मला ते व्हावे
आज एक तर उद्या वेगळे
रंग फुलांना द्यावे

दि. २४/१२/२०२२
दुपारी ०३ .३२ वा.



## (३०)
## सावली कर माऊलीचा

सावल्यांनी काढलेल्या रांगोळ्या
त्या उन्हाच्या तिरिपांवरती वाकल्या
झोंबल्या जणू फांद्या फांद्यावर अहा
नक्षी कुसरी केवढ्या त्या टाकल्या

कोण रचितो कोठे ही नक्षी सुबक
हाती सूर्याच्या विराजे त्याचे तबक
तो फिरे जैसा जिथे मनमोकळा
सावलीच्या रंगती मोहक कळा

रंग सांगा कोणते आणि कितीसे
सप्तरंगी किरणे त्याची आणखीसे
सावली काळी तरीही सुंदरी ती
दे दिलासा या जिवाला परोपरी ती

सावलीचे रंग सारे वेगळाले
उष्णतेचे दाहकावे हे पळाले
शीतलता अन थंडाव्याचे दे फवारे
दुःख नाही दे सुखाचे ती धुमारे

शांती अन विश्रांती येथे नांदते
सावली हे खेळ सारे मांडते
पाठशिवणीचा हो खेळ ऊन छाया
तळपून जाणाऱ्या उन्हातुन थंड माया

साथ मिळू दे सावलीची जीवनात
हात मिळू दे हाती रमत्या यौवनात
सूर गवसु दे मनाला सावलीचा
ऊन असू दे सावली कर माऊलीचा

दि.०५/०१/२०२३
सकाळी ०९.५६ वा.



## (३१)
## दोडका रे दोडका

दोडका रे दोडका
आगाऊ न थोडका
बिघडले पोट तर
नका खाऊ बरं का

किस बाई किस
दोडका किस
सासवा सुनांची
देख किचकीच

एखादं पोर उद्धटखोर
ऐकत नाही काही हरामखोर
उपमा त्याला दिली कोडगा
रगेल असतो तो दोडका

दोडक्याच्या शिरा
त्यांची चटणी करा
खवैय्ये बापडे
त्याला तिळाचा मारा

दोडका गरेदार
भाजी चवदार
रस्सा करा की
सुका तो भावदार

देवाजीची करणी
भाज्यांची भरणी
उदार निसर्ग
खाण्या पर्वणी

दि.११/०१/२०२३
सकाळी ०८.३४ वा.



## (३२)
## रंग रंग त्याचाच

उन्हांनाही वाटत असेल
रंग जरा व्हावे
कधी हिरव्या निळ्या पिवळ्या
केशरात न्हावे

काय बरं एकच एक
रंग साऱ्या अंगा
सरमिसळ होऊन जावी
चालो रंगीत दंगा

पहुडले ऊन जरा
एकेका रंगावर
रंगीत उन्हं किती गोड
रंग पांघरून अंगावर

सोहळेच हे आगळे हो
पारणे असे फिटावे
कसल्या कोणत्या रंगात बरे
ईश्वराने भेटावे

रंग रंग त्याचाच
संग संग त्याचाच
कळेल तर श्रीरंग
न कळता बेरंग

आपण मात्र एकच करावं
प्रत्येक रंगात न्हाऊन जावं
उन्हातल्या सावल्यांनीही
रंगांना पाहून घ्यावं

दि.२१/०१/२०२३
रात्री ११.४७ वा.



## (३३)
## असेच रहावे चित्र देखणे

हे कुठले रे गाव सख्या किती
लुभावते बघ मजला
साऱ्या मनीषा उमलून आल्या
आसमंत बघ सजला

भिजल्या कलिका धुंद जाहल्या
दवात ओल्या वेळा
चांदण्यात रजनी ओथंबून
रेंगाळून जा मेळा

रंग रंगुले किती रे खुलले
जशा आपुल्या प्रीतभावना
सरोवरातून चित्र उमटले
थांबव प्रियवर माझिया मना

असे भरभरून येती सारे
मनात रंगांचे हे धुमारे
सुख ओसंडून वाहते प्रियतम
हात तुझा हा हाती हवा रे

जपून ठेवू मनात साऱ्या
मनोरमशा लाघववेळा
स्वप्न अवतरे की स्वर्गीचा
अजोड ऐसा लावण्य मळा

असेच रहावे चित्र देखणे
जगणे आपुले सुंदर होणे
मी तुझ्या तू माझ्यामध्ये
राजा अलगदसे रे विरघळणे

दि.२९/०१/२०२३
सकाळी १०.४७ वा.



## (३४)
## सृष्टी सौंदर्याची खाण

सांजाळल्या दाही दिशा
गोल गोलक पिवळा
निघे पश्चिम तीराशी
सूर्य साधक तेजाळा

करवा चौतीला चांदवा
चाळणीतून पहावा
मग साजन मुखडा
जसा तसाच चहावा

आज झाडांची चाळणी
रेघरेघांची गाळणी
वनी नटलेली चौत
त्याच्या तेजाची माळणी

किती देखणा दिसतो
जगताचा हा पोशिंदा
त्याचे प्रभातीचे रूप
असो सांजेचा कशिदा

सृष्टी सौंदर्याची खाण
पाहण्यास जरा जावे
क्षण टिपून आणता
झोळी भरुनिया यावे

दि.०१/०२/२०२३
सकाळी १०.४३ वा.



## (३५)
## कोण ना रमे

सरसतीरावर किती नारळी
सुंदरशा झुकल्या
मऊ मऊ हिरवळ कंच पोपटी
त्यावर गवत कळ्या

वर आकाशी मंडप निळसर
गर्द फिक्या त्या छटा
मधून डोकवे रंग पांढरा
सजवून साऱ्या नभा

सरोवरातील शांत नितळ जळ
मनात सळसळ
पाण्यावरती तरंग उठती
मनात खळखळ

बिंब देखणे प्रतिबिंबाचे
लावण्याचे खेळ
कोण ना रमे अशा प्रसंगी
जुळुनी येता मेळ

तोही भेटतो जरा शांतसा
निवांत येथे दिसतो
देव, दिलासा आणिक देश हा
आपुलासा असतो

दि.०१/०२/२०२३
सकाळी ०७.३७ वा.



## (३६)
## फूल की ती भूल मी

वाटते कधी एकटे न
चालणे मार्गावरी
सांडलेल्या पाकळ्यांना
रुजविणे वरचेवरी

रंग हिरवे आणि पिवळे
रंग लाल नि केशरी
जगणे रंगारंग व्हावे
राजसाच्या अंतरी

ती फुलांची बाग खाली
पहुडलेली भास ना
स्पर्श कोमल होऊ द्यावे
काळजाचे त्यास ना

पान होती फुल सारे
पुष्प उमलून डोलती
घेतली जागा कुणाची
तरी न काही बोलती

वाटते दुलई कधी ही
पांघरुनी पहाटेस मी
पहावे रानातील होऊन
फूल की ती भूल मी

दि.२४/०२/२०२३
सकाळी ०७.५९ वा.



## (३७)
## प्रीतकुसुमांचा सडा

हे रम्य उपवन की गुलाबी
चांदण्याची रांगोळी
मदन खेळे रतीसवे
येथे वसंती चांदोळी

पानोपानी जागलेल्या
मृदुल कवळ्या भावना
उन्मनातून राजसाच्या
रंग ल्येती कामना

देखणे हे काळजाचे
चित्र कोणी रेखिले
या धरेवर स्वर्ग सुंदर
वन नंदन देखिले

आतुनी उमटून येती
मधुर कविता लाजऱ्या
शब्द माझे  भाववेडे
कल्पना त्या साजऱ्या

भेट माझी तुज स्मरावी
येथल्या तरुतळी सदा
टाकलेला मी सख्या रे
प्रीतकुसुमांचा सडा

दि.०२/०३/२०२३
सकाळी ०९.२३ वा.



## (३८)
## त्या अंधारातून जागते

गाळून पडते इथे चांदणे
अंधाराची चाळण
काळ्या काळ्या कुट्ट रातीला
आशाफुलांची माळण

ही सरणारी न थांबणारी
कशास चिंता गहिरी
भीती अनामिक नको काळजा
ठरण्या देऊ जिव्हारी

कधी अमावस कधी पौर्णिमा
आत टिपावे धागे
त्याही क्षणांना जगुनी घेता
जीवन नवेच जागे

जरी अंधारली रात्र भयानक
घट्ट मिटावे डोळे
आत सापडे प्रकाश थोडा
स्वप्नंही काही भोळे

मग उघडावे अवचित दोन्ही
नेत्र नव्याने पाही
त्या अंधारातून जागते
वाट नव्याने काही

दि.०५/०३/२०२३
सकाळी ०९.१३ वा.



## (३९)
## रास रंगून हसे श्रीरंग

सुगावा लागला आता
रंग गेले कुठे होते
सकाळी प्राचीवर पसरून
सांजेला रंगले होते

रोजचे रंग निराळे जे
फुला पानात दडलेले
नभी उमटून इंद्रधनुने
रंग सोहळे ते घडलेले

दिशा रंगून जाताना
उषा रंगाळली जाते
निशा रंगात डुंबूनी
अशी गंधाळली जाते

रंग स्वर्गीचे उतरून
उद्यानी काननी खुलती
रंग पंखात मोराच्या
होत लावण्ये हो डुलती

रंग खडकात पाषाणात
रंग रतनांच्या खाणी
कधी हिरवे निळे भुरकट
कधी रंगीतसे पाणी

ही धरा रंगशालू ल्येते
ऋतूंच्या कमानीत न्हाते
रंग मनी होऊनी सरिता
सुखाचे दान देत वहाते

असे हे रंग दिसती बाहेर
अंतरी वेगळाले रंग
आतुनी जोडताच त्याला
रास रंगून हसे श्रीरंग

दि.०७/०३/२०२३
सकाळी ०८.२७ वा.



## (४०)
## असे असावे घरकुल आपुले

हिरवळ सुखाची दे थंडावा
स्पर्श रेशमी तिचा
घराभोवती कोमल पहारा
हवाहवासा जसा

उन्हे सकाळी होत हळदुली
सोन्याचा शृंगार
ऊब कोवळी बाळ सानुली
चराचरी अभिवार

किंचित पडते धुके पहाटे
दवराणी खुलते
लाजलाजरी उषा त्यावेळी
लावण्या भुलते

झाडे डोलती वाऱ्यासंगे
सळसळ पाने फार
हवा अंगाशी खेळ खेळते
थाट तिचा तो गार

असे असावे घरकुल आपुले
निसर्ग माया अपार
साथ आपुली असो निरंतर
प्रीतही अपरंपार

दि.०९/०३/२०२३
सकाळी ०८.४९ वा.



## (४१)
## घ्यावी सोनेरी सकाळ

धुक्यातुन गाळलेली
घ्यावी सोनेरी सकाळ
तिची किरणं कांचनी
गळा मोतीयांची माळ

तिच्या ओठावर हसू
दिस झाला कसा सुरू
मंद वाहतो वाराही
तिचे केस भुरुभुरू

जरा वसन मोकळे
आता घट्ट केले तिने
बांध कंबर कसून
काम आरंभीले तिने

गेली चरचरावर
छबी आपुली टाकत
जळी दिसली सुंदर
जरा अवचित वाकत

सांज होईल तोवर
तिला दम नाही बाई
असा उरक कामाचा
तिला तेज देण्या घाई

क्षणी गोड हासली ती
क्षितिजास टेकली ती
पहाटेला रम्य कोणी
अप्सराच वाटली ती

दि.१७/०३/२०२३
सकाळी ०८.२८ वा.



## (४२)
## असे मीलन देखणे

अलगद उघडल्या
दल कोवळ्या पाकळ्या
रंग उन्हाचे लेऊन
सोन सोनेरी साखळ्या

आत कुपी अत्तराची
दडविली खोल खोल
कण पराग होऊन
गंध वाऱ्याशी रे डोल

मधूप्राशनास आली
भृंग झुंबड राकट
मधुरव गुंजनात
सारा बहर झाकत

वनातली ही दिवाळी
रोज रोज तेजाळते
दिवे पेटून उठती
वनराई त्या माळते

धुंद रंग पसरती
अंग अंग मधुमय
हृदयात उमलते
प्रिया करे अनुनय

असे मीलन देखणे
रोज कृसुम सुमनी
सुकुमार नि नाजुक
माझी प्रियतम राणी

दि.१७/०३/२०२१
सकाळी ०९.२२ वा.



## (४३)
## दान मिळेल नभाचे

ऋतू अंथरला ऋतू मंतरला
रंग कोणते कसे
मनी मदनाचा फुले पिसारा
मधुमास हा वसे

पानोपानी रंग वेगळे
तो सांडून देतो ना
झाडे वेली रम्य सुगंधही
तो मांडून देतो ना

वारे गंधित हलके हलके
उडतील अवकाशी
तशा मीलनाच्या या आशा
फुलती परागाशी

रंग गुलाबी गेले पसरून
गुलाबी तरुतळ सारे
मखमल गेली पसरून पदतळी
पसरले शीतल तारे

इथे घालवला एक जरी क्षण
सार्थक युगायुगाचे
प्रीत पडेल जी पदरी मोहून
दान मिळेल नभाचे

दि.२०/०३/२०२३
सकाळी ०८.५७ वा.



## (४४)
## आल्हादाचा रंग गुलाबी

मंद्र गुलाबी तंद्र तंद्री ही
सुंदर पाने बहराची
रंग रूप किती विलोभनीय हे
मेजवानी नित प्रहराची

अलगद चढतो रंग मनावर
दंग करून सोडतो क्षणी
क्षणात माझा असताना मी
प्रियेचा अवचित होतो झणी

जळात उतरून परी गुलाबी
क्षितिजावरती रेंगाळे
नभांगणातही रंग गुलाबी
मुशाफिरी करतो चाळे

लाडिक लाडिक गोड गोडवा
रंग गुलाबी गालावर
प्रिया लाजते होत गुलाबी
दैव गुलाबी भाळावर

आल्हादाचा रंग गुलाबी
श्याम निळाई विसरे हा
राधेसंगे होत गुलाबी
कुंजवनातून पसरे हा

दि. ०३/०४/२०२३
सकाळी ०७.५२ वा.



## (४५)
## रंग आपुले स्वच्छंद कलंदर

जगण्यामधले रंग असे
अंगावरती पसरून द्या
उधड उधडल्या रंग उडवत्या
चिंता साऱ्या विसरून जा

डोळ्यामधले चित्र रंगले
समोर दिसते ते ते रंगीत
कुणा ऐकू येईल ऐसें
ऐकून घ्यावे आतले संगीत

रंग फुलांचे अन पानांचे
ऋतुऋतुतील रंग टिपावे
शिशिरातही गळतीचे हे रंग
अनोखे मना दिसावे

रंग पंचमी रोज देखणी
निसर्गातली घ्यावी जाणून
जेही मिळाले रंग आपल्या
रंग सुखाचे घावे मानून

मौनाचेही रंग निराळे
शब्दांना तर छटाच सुंदर
असा कशिदा रोज भरावा
रंग आपुले स्वच्छंद कलंदर

दि.०४/०४/२०२३
सकाळी ०६. ५३ वा.




## (४६)
## सोडून द्यावे खुले जरा मन

कोण असे हा चित्रकार की
तरबेजीचे चित्र रेखीतो
असे वाटते उभे सामोरी
स्वप्नं मनातील असे वेचितो

आकाशाची फिकट निळाई
जळात बुडवून पाय ही बसली
झाडांवरचे वसन हिरवळी
सुंदर रमणी नेसून दिसली

झाडांवरचा सावरीचा मऊ
कापूस ढगात गेला पिंजून
गुणगुण कानी सुरेल येते
धून मधुमती मधुरा रुंजून

होड्या नावा जळात फिरती
जणू भ्रमंती गमतीजमती
त्याही जळराणीसव असतील
गुजगप्पांमधुनी ह्या रमती

काठावरचे घरकुल सुंदर
किती मोहवुन करते उन्मन
असे वाटते इथेच रहावे
सोडून द्यावे खुले जरा मन

दि.०६/०४/२०२३
सकाळी ०७.४८ वा.



## (४७)
## तरी रोज चित्र न्यारे

उधळून कोण देतं
सोन्यात गाव न्हातं
ती लाल माणकाची
ऐश्वर्ये साठवीत

केला कुणी फवारा
पहाटेस प्राचीवरती
सांडून गेली नवखी
ती केशराची पोती

पाण्यात निरखे वाकून
ते नितळसे हो दर्पण
पाणीही मग्न पाहण्या
करते स्वतःस अर्पण

ना एक लाट उठते
सारेच शांत शांत
काठावरी पहुडली
सृष्टी पहा निवांत

सारेच गुंतलेले
रंगांचे खेळ सारे
होते सकाळ रोजच
तरी रोज चित्र न्यारे

दि.०८/०४/२०२३
सकाळी ०७.३४ वा.



## (४८)
## हिरवा उत्साह सांडला

रोज खुणावते दाटी
झाड झुडुपांची ताटी
हिरवा उत्साह सांडला
पानापानाच्या उराटी

काळ्या कुट्ट अंधाराला
रोज गुडूप करून
एका तेजाला भरते
तेजशालू पांघरून

डोंगरात लपलेली
गर्द निळाई डोलते
रोज रोज एक भाषा
जगण्याची ती घोळते

वर गगनात झूल
आकाशाची नवलाई
कधी टेकते खाली ते
क्षितिजाशी लवलाही

असे वाटते जर का
खरे खरे जगावे
मग निवांत इथेच
भुईवरती निजावे

घ्यावे मिटून त्या घट्ट
भुलवणाऱ्या डोळ्यांना
आत केवढा प्रकाश
सामावतो भावनांना

दि. ०७/०४/२०२३
सकाळी ०७.१३ वा.



## (४९)
## चांदणीची कहाणी

अहा डोकावून पाहते कोर तेथे
अजून चांदणी रमली उजेडात येथे

विसरून गेली स्वतःला सुखाने
दे झोकुनी चंद्रकांता मुखाने

गेली बुडूनी रात्रीस जैसी
ते चांदण्याचे क्षण विसरे कैसी

परि ही सकाळ तिज मोहवीते
आणिक गगनात तिज थांबवीते

धवल शिखरे साक्षी तिच्या त्या उधाणी
नभी जळी तरुतळी चांदणीची कहाणी

दि.११/०४/२०२३
सकाळी ०६.४७ वा.



## (५०)
## रानोमाळी फुलल्या ओळी

लंब तुरे हे फिके जांभळे
लोलक राधेचे
शोभून दिसती कर्णडूल हे
सोज्ज्वळ साधेसे

हिरव्या हिरव्या कुंजवनातील
रास सावळ्याची
ही राधेच्या अंतरातली
आस सावळ्याची

फुलून आल्या जरी स्वर्गातून
नजर धरणीवरती
कुणी अप्सरा पुष्पतुऱ्या ह्या
सौंदर्या भरती

उगा पहावे ऋतू सहाही
अलंकार त्याचे
रानोमाळी फुलल्या ओळी
हुंकार असती ज्याचे

साठवून ते रंग निराळे
रूप वेगळाले
क्षणात लखलख तेज उमटता
मालिन्यही पळाले

दि. १४/०४/२०२३
सकाळी १०.०३ वा.



## (५१)
## आठवणींच्या पिंपळगाठी

गावामधल्या पिंपळतळी त्या
किती खेळलो झाल्या गप्पा
घराकडे मग जाण्याआधी
इथेच विश्रांतीचा टप्पा

पानोपानी सळसळ होऊन
तोही अनुमोदन देतसे
माझ्या संगे थोडे रमुनी
सुख जरासे तोही घेतसे

असो ऋतूंचे चक्र कोणते
त्याची सावली शीतल वाटे
आजही मजला किती दिलासा
त्याच्या पारावरती भेटे

उगा वाटते तोही झुरतो
माझ्या आठवणीतून मुरतो
क्षणोक्षणी तो माझ्या देखील
सुंदर स्मृतिकोशातुन उरतो

आठवणींच्या पिंपळगाठी
रुजून जाती अशा खोलवर
रुंजी घालून मोह क्षणांची
अमोल करतील त्याचे मोल तर

दि. १९/०४/२०२३
सकाळी ०९.१३ वा.



## (५२)
## जगण्या उभारी देई

या तरुतळी घरकुल हे देखणे
निसर्ग सजला इथे
पक्षी उडती स्वच्छंदाने
रंग विहरती जिथे

फुलाफुलांचे फुलून आले
ताटवे मोहक सुंदर
मनही उडते डुलून जाते
उमलून नाचे कलंदर

सवे मनाच्या उडती अगणित
मोदे फुलपाखरे
आकाशाचे रंग सुरेखही
क्षण सारे साजरे

अशा घराचे सुखची वेगळे
मूर्त नांदे तृप्तता
एक अनामिक खुणवत राहते
काळजास शांतता

इथे रमावे निवांत थोडे
जगण्या उभारी देई
बळ आपसुक पंखात येऊनी
चित्त भरारी घेई

दि.१७/०५/२०२३
सकाळी ०८.२९ वा.



## (५३)
## स्वच्छंदाचे रसाळे

सूर्य उगवला,फुले उमलली
रंग खुलुनिया आले
धरातलावर दृश्य मोहवीत
वृंदावन जणू झाले

ऐट वेगळी थाट आगळे
फूल फुलूनी निराळे
मला भेटते रोज नव्याने
स्वच्छंदाचे रसाळे

कधी वाटते होत रोपटे
रुजूनी घ्यावे स्वतः
आतून देऊन रस गंधाच्या
कुसुमा राशी पुनः

कधी वाटते होत कळी मी
जरा जराशी लाजो
कधी फूलपाखरे थवे नि
गुंजन त्यांचे गाजो

हिरव्या पिवळ्या निळ्या नारंगी
शुभ्र वर्णात भिजुनी
पिऊन घ्यावे सुख चैतन्ये
म्हणत थोडे अजुनी
म्हणत थोडे अजुनी

दि.१८/०५/२०२३
सकाळी ०८.४७ वा.



## (५४)
## तुझ्या श्याम नीलरंगी

तुझ्या निळाईची भूल मला इतकी पडते
नकळत पाऊल हे तुझ्या सवेच अडते

किमया ही सारी सारी तुझी भुलवे जीवाला
लाभे निवांत निवारा माझ्या उनाड मनाला

तुझे नभ निळेशार नग निळे निळे फार
जळ निळ्याच गुणाचे, निळाईचा वारा गार

फुले उमलून आली निळ्या पाकळ्यातुनी रे
निळे काठ तलावाचे निळी नदी आतुनी रे

तुझ्या श्याम नीलरंगी नील राधा जणू व्हावी
एक तान निळी निळी, वेणू सूर निळे गाई

दि.३१/०५/२०२३
सकाळी ०७.५० वा.



## (५५)
## बहावा

गुलमोहरा शेजारी ,फुललेला हा बहावा
आपुल्याच सोनेरीशा, धुंदीत हा पहावा

लेऊन स्वर्णलोलक, कुणी हासऱ्या पऱ्या त्या
कांचन झग्यातल्या की, कुणी राजकुमाऱ्या त्या

का नववधू सलज्ज,हळदावलेली गोरी
की शालू पैठणी ही, जणू झुंबरांची कोरी

हिरव्या ऋतुतली ही, पिवळी फुले सुरेख
फुलता बहावा येतो, पाऊस मागे देख

डोळ्यास हा दिलासा, उन्हे थंड गार गार
बसतो मनात नेहमी, छेडी सुखाची तार

दि.०४/०६/२०२३
सकाळी ०५.२७ वा.



## (५६)
## ठेवा सुंदर काजव्यांचा

काजव्यांनी भारलेली रात वेडी
तेज पुंजीने भरावी कृष्ण साडी
सावरावा तो पदर कैसा तियेने
काजव्यांच्या टिमटिमीची चाले खोडी

एक नीरव शांतता त्यातून वाहे
काजव्यांचे गाव मजसी मोहताहे
वाटते येथेच राहू काळ थांबो
आतले आवाज थोडे ऐकताहे

चमचमटाच्या दिव्यांची ही दिवाळी
रात सारी जाय उजळून काळी काळी
एकटे जावे की संगे कोणी असता
अंतराला काजव्यांची माळ माळी

एक धुंदी चालते उडण्यात त्यांची
काय सांगे एक लय ही बांधण्याची
ती प्रिया भाळून गेली तर नवल ना
शर्थ सारी रात वेड्या काजव्यांची

सोहळा हा काही क्षण काही दिसांचा
घ्या मनी तो साठवून हो कांती साचा
ना कधी विसरून जातील क्षण हे सारे
लाभलेला जो खजिना मज सुखाचा

रत्न मौलिक ठेवा सुंदर काजव्यांचा....

दि.१०/०६/२०२३
सकाळी ०८.५० वा.



## (५७)
## अहा बाहेरी ती वनराई

गाव इवलेसे घर ती झोपडी
साधी साधी सरळ बापडी
साध्या वाटा साधी माणसे
माणुसकी ही इथे सापडी

हिरव्या हिरव्या हिरवाईच्या
थंड झुळुकाही झोके घेती
वाऱ्यावरती सरळपणाच्या
कथा कोवळ्या वाहत येती

कुणी बांधले मंडपी पाचू
सुख डोळ्यांना ताजे वाटे
एक वेगळी शांती इथल्या
कणाकणातून निश्चित भेटे

तुडवून गेलो तरी न सुटते
माती पाया घट्ट बिलगते
दुःख कोणते कसल्या वेदना
अलगद सारे सहजी विलगते

आत कुटीच्या जग ते सुंदर
लावण्याची रंगवू चित्रे
अहा बाहेरी ती वनराई
भारून जाती सारी गात्रे

दि.१५/०६/२०२३
रात्री १०.३७ वा.



## (५८)
## सोन सकाळी सकाळी

वाट तेजाळली कशी
सोन सकाळी सकाळी
केशराचा टिळा तिच्या
उजळला देख भाळी

तरारली वृक्षराजी
पानाफुलांची आरास
खग कूजन चालते
सूर आळव भरास

किरणांचा जाळीदार
पडदा ही लाज लाजे
दूर दुरून सागरी
लाट लाट जोरे गाजे

सारे गवत हुशार
उन्हं पांघरून घेती
दवबिंदू माळ गळा
सजवुनी मग देती

आहे आहे सारे आहे
जीव चैतन्ये डोलती
शब्देविण संवादाची
अशी मधुर बोलती

दि.१७/०६/२०२३
सकाळी ०९.२१ वा.



## (५९)
## ही उषा रमवून जाते

सुंदराच्या देखण्याशा या सकाळी
उठवुनी देहास दे सृष्टीस टाळी
हालणारी पल्लवे गातात काय
वाहणारी ही हवा छेडी गाली

त्या तिथे प्राचीवरी रविकिरणे आली
उगवून भानू  तेजवर्षा गर्द झाली
रंग सारे येती उभरून अंबरात
आकाशपटली चित्रकारा जाग आली

ती नदी अजुनी जरा गुंगीत आहे
वाहते ना स्वप्न जळी  रंगीत आहे
उठल्या लाटा ज्या कधी वेगात वेड्या
आज त्यांचे मौन हे संगीत आहे

थांबलेली होडी पाहे दर्पणाला
पारदर्शी जळ पुरे समर्पणाला
भाव सारे एकवटले लाजताना
ती सख्यासाठीच सज्ज अर्पणाला

काठ वाटे साखरेच्या झोपेमध्ये
दंगलेला तो अजूनही रातीमध्ये
पेंगुळली अंधार राणी थोडी थोडी
कस्तुरी केशर मिसळले संध्येमध्ये

शांत परिसर जागतो अवचित आता
ओळी पक्ष्यांच्या सुराने गाता गाता
जाग येते गाव बोलू लागताना
ही उषा रमवून जाते जाता जाता

दि.१९/०६/२०२३
सकाळी ०७.३७ वा.



## (६०)
## जलधारा झेलून हाती

जलधारा झेलून हाती
ती शीतलता सांगाती
उडणारे तुषार मुक्त
गीतही मुक्त ते गाती

मज क्षणात वाटे जावे
जन्माला जळ हे व्हावे
झरे नदी कालवे पाट
तळे धरणं सागर पहावे

कोपताच दिनकर वरती
होऊन गुप्त मी जावे
वाफेचे लेऊन रूप
निरनिराळे मेघ बनावे

हलके हलके वाहून
वाऱ्याची सैर करावी
मग भरून जीवन पोटी
सरसर वर्षा बरसावी

मग पुन्हा कोसळून खाली
धरतीच्या कुशीत रुजणे
पुन्हा कुणाच्या हृदयी
चातकासवे ते भिजणे

कुठे येतील अंगी शहारे
कुणी हर्षुन जातील ना रे
कुणी प्रिया भेटीच्या साठी
मन चिंब होऊनी पहा रे

कुठे भिजवून शेती माती
नवं अंकुर पाहून घ्यावे
मग पुन्हा स्वतःला झोकून
नवं चैतन्ये ही ल्यावे

मी जीवन जल नीर सलील
अंबु आप अमृतम्
उदक सोम ऋत सार
क्षीर वारि पय तोयम्

दि.०१/०७/२०२३
सकाळी ०८.४८ वा.



## (६१)
## किती शांत सुंदर

किती शांत सुंदर ही सृष्टी फुलावी
किती रम्य लाघव ही दृष्टी झुलावी

तवाना हा हिरवा जणू भाव कोमल
तरारून आली ही मऊशार मल्मल

इथे एक घरकुल टुमदार शोभे
सुखाचा परिसर वनाई विराजे

त्या पर्वतांच्या राशी निळ्याशा
टोके तयांची चाफेकळ्याशा

जळी रंग हिरवा निळा नांदताहे
बिंबासवे रूप हे सांधताहे

असे दिव्य सारे निवासा मिळावे
सवे भाग्य आपुले खासा फळावे

दि.०६/०७/२०२३
रात्री ११. ४३ वा.




## (६२)
## नव्या नव्याने खुशीत थोडे

धुक्या धुक्याने धूसर झाली
वाट वाटुली ओली ओली
जरा सांभाळुनी चाल चालली
सांगा कुणावर भाळुनी गेली

लाज लाजुनी गाली आली
ती हिरवी अन  बरवी झाली
जरा जरा मोहरुनी जाता
जरा डोलुनी बोलून गेली

तो वारा बघ अवखळ भारी
संगे रसिकता सारी सारी
चुंबून जातो  तिजला आणिक
वाहत सुटतो दिशाही चारी

नको नभाचे काही विचारू
किती हर्षुनी कोसळू पाहे
भरभरुनी जलधारा देही
प्रियेसाठी ते पघळून वाहे

वनराई अन पर्वत सारे
हरित मनांचे गडदसे गहिरे
पाचू पेरून सजली सृष्टी
चमचमणारे दवांचे हिरे

राहून यावे कुशीत थोडे
वनराणीच्या मुशीत थोडे
विसरून जाऊन ताणतणावही
नव्या नव्याने खुशीत थोडे

दि.०८/०७/२०२३
रात्री ०९.१२ वा.



## (६३)
## तरी आस मज मनी उरावी

हृदय अंथरून द्यावे ऐसे
मऊ मखमाली गवतावरती
प्रीत झऱ्याचे पाणी झुळझुळ
वाहत जाता ओली धरती

काळजाचे मग पाणी पाणी
होऊन गाईल  सुरेल गाणी
नाद वेगळा सूर आगळे
ऐकून घ्यावी दिव्य ती वाणी

असे वाटते कधी न जावे
कायमचे घर इथे करावे
डोंगर दरुल्या हिरवाईच्या
कुशीत जन्मा सार्थ भरावे

निळ्या नभाचे दान निळेपण
पर्वत सावळे धुंदी कळे पण
तसेच राहती धुके पांघरून
आत केवढे भरभरलेपण

वाट इथे ही सुरूच व्हावी
इथेच संपून रम्य ठरावी
चालत रहावे कितीही जरी मी
तरी आस मज मनी उरावी

दि.०९/०७/२०२३
सकाळी ०९.५४ वा.



## (६४)
## घरटे छोटे असे एकटे

चल घेऊन ऐशा नितळ निसर्गी
घरकुल सान बांधून
किती रंग बघ इथेच रमले
सृष्टीस रेंगाळून

डोंगर हिरवे निळे पांढरे
खुशाल नटूनी जाती
हिरव्या हिरव्या झाडांच्या ह्या
छटा निराळ्या होती

सरोवरातील जळी उतरली
जलराणी निळी हिरवी
चित्र रेखते दिसते सुंदर
स्वतःस निरखे बरवी

आकाशाचा रंगच खुलला
निळाशार उजळुनी
मधे पांढऱ्या शुभ्र रेशमी
नक्षी मेघाळुनी

हिरवा पोपटी गालिचा हा
तृणांकुरे मलमली
प्रीत फुलावी रम्य स्थळी या
एकांती शाल्मली

घरटे छोटे असे एकटे
साथीला स्वर सात
काय हवे रे अजून राजा
हाती तुझ्या मज हात

एकरूप या सृष्टीसंगे
होऊन जावे गुंग
किती काळ सरसरकून गेला
आपण इथेच दंग

असे असावे स्वप्नं सुरीले
इंद्रधनूचे रंग
वास्तव ऐसे कधी लाभता
अजरामर तो संग

दि.१६/०४/२१
दुपारी १२.४७ वा.



(६५)

**मनास उंचावरून झोकता**

धबधब धबधब पडे धबधबा
कोसळताना दुःख ना मना
सौंदर्याची करुनी पखरण
जितके जीवन झोकून दे ना

येईल वर्षा सरी बरसतील
वेगे त्यांच्या आवेगाने
कुठे सांडले चित्त भाळुनी
पहा कुणावर त्या मेघाने

कुठे साठले पाणी आपसुक
वाहून जाण्या होई उतावीळ
कुठे झिरपुनी झऱ्याझऱ्यातून
छेडीत तारा मनास मोहील

हिरवाईने वस्त्र देखणे
शुभ्र शटिका जणू पांघरणे
शेला तियेचा लांब लोळतो
डोंगरातुनी तिने वाकणे

फिटे पारणे या जन्माचे
क्षणभर मनात भरून घेता
होत धबधबा कोसळू पहा
मनास उंचावरून झोकता
मनास उंचावरून झोकता

दि.१२/०७/२०२३
सकाळी ०८.२३ वा.



## (६६)
## सारे कासार शोभते

फुललेल्या कासारात
हसणारी ही कमळे
कळ्या डोलून वाऱ्याशी
गुज कानाशी चालले

चंद्र चांदणे शिंपडे
रंग दुधाळी पसरे
नभ अलगद वेडे
तळ्यामध्ये का घसरे

पानोपानी चित्रकारे
रेखवून द्यावी कला
तरंगत हिरव्याशा
पटली हवा चंचला

सांज देखणी लाजते
निशा सुंदरी गाजते
कुठूनसे सूर नवे
गीत नवेच वाजते

रात जागते जागते
सारे कासार शोभते
किती सुंदरशी शांती
इथे लाभते लाभते

दि.१८/०७/२०२३
सकाळी ०८.१३ वा.



## (६७)
## मनसोक्त फुलून घ्या

ऋतू किती सुंदर ना हा
सगळे हिरवे हिरवेगार
निसर्गाच्या लावण्याचे
रंग सारे निराळे फार

डोंगर बोडखे असताना ते
कसेतरीच वाटायचे
पाऊस बरसून गेला आणि
रम्य सारे भेटायचे

मिळेल तिथे उगवून वाढून
पसरून गेली हिरवाई
नजरेत किती साठवून घ्यावी
हरित सुंदर बरवाई

मन ओसाड विराण होतेच
झळा त्याच्या बसतातच
कुठून तरी सर येते
आशा नव्याने हसतातच

फुलता येईल तेंव्हा मग
मनसोक्त फुलून घ्या
पुन्हा ऋतू बदलला तरी
आठवणींचं गाव द्या

बाहेर ऋतू सहाच तरी
मनात वसती अगणित हो
एक क्षण एक ऋतू
जीवनानंद द्विगुणित हो

दि.२३/०७/२०२३
सकाळी ०९.२७ वा.



## (६८)
## रूप सापडे नित्य नवे

कातळ काळे झिरपून गेले
मखमल हिरवी वर चढली
असे बरसले मेघ जोराने
धार धबधब्याची पडली

तो त्याचा जो खळखळ अवखळ
नाद वेडसर मोही मना
जवळी जाता कवेत घेतो
तुषार शहारा देती तना

त्याच्या सवे मी किती रमावे
आठवणींच्या बरसाती
सूर उनाडसे कोसळताना
उमटून येती नवं नाती

तू मी असता सखे सोबती
निवांत झुळझुळ गीत जुळे
केवळ मोहून जाती क्षण क्षण
घुमती नाद हे किती खुळे

जलधारा या अशा वेडुल्या
वाहत जाती तुझ्यासवे
अस्तित्वाची खूण न राहे
रूप सापडे नित्य नवे

दि.३०/०७/२०२३
सकाळी ०८.४७ वा.



## (६९)
## ऋतू खुलावे असे सोहळे

भरलेल्या आभाळाची चादर ओढून घेते
ही धरणी भिजलेली कशी मोहरून जाते

अंगोपांगी दवबिंदूंच्या मोत्यांची ही साडी
रानोमाळी गवतफुलांची कुजबुज चाले थोडी

आज ही धरा दिसते सुंदर कुठून लाज उमटली
प्रियतम भेटीसाठी उत्सुक पाकळीत कळी मिटली

हे क्षण मोहक बरसण्यातले अलगद जपणे आहे
ऋतू खुलावे असे सोहळे आपसुक मोहणे आहे

हे नाते ना कुणा कळावे हृदय कोंदणी ठेवू
पुन्हा एकदा बेधुंदीच्या वर्षावातच न्हाऊ

दि.०३/०८/२०२३
सकाळी ०८.४३ वा.



**(७०)**

## जरा रुजवावे स्वतःला

डोंगर पायथ्याशी असा, हिरवाईचा सडा अंथरला
ऋतू वर्षावाचा आला, कणकण इथला मंतरला

उभी झाडे दिमाखाने, दवांच्या माळा लेवूनी
फुलांनी झटकीले स्वतः, शहारे अंगी येऊनी

स्वतःला झोकुनी देती, धबधबे जोमत्या चाली
दुधाच्या रेघा ओघळती, क्षीरगंगेतुनी खाली

सारे सींरेच बोलतात, आपुली भाषा निराळी जी
शब्देविण चालती संवादे, शांतीमय रीत विराळी जी

जरा रुजवावे स्वतःला, अंकुरांच्या खुशीसाठी
जरा मृण्मय होता यावे, परिमळांच्या कुशीसाठी

दि.०४/०८/२०२३
पहाटे ०५.३२ वा.



## (७१)
## स्मरत रहावे देखावे

कोमल नाजूक मृदू सुंदर मऊ
हळुवार सुकुमार अरुवार
स्वप्न उतरले अवनीवरती
पाऊल टाकू अलवार

घर प्रासादही सजले येथे
फुलाफुलांच्या आरासी
घ्याव्या भरुनी सुखासुखांच्या
अलगद हृदयी नित राशी

धुके पसरते चित्र पुसटसे
गुडूप क्षणातच हो भलते
स्वर्ग अवतरे दृष्टीपुढती
क्षणात नंदनवन खुलते

तरारलेल्या तृणांकुरांच्या
पायघड्या मखमल स्पर्शी
गोड गुलाबी थंडी पडते
तनमन झुलते किती हर्षी

पुन्हा पुन्हा विसरून स्वतःला
स्मरत रहावे देखावे
अंग एक होऊन तयांचे
छायाचित्र होऊन रहावे

दि.०५/०८/२०२३
रात्री १०.०७ वा



## (७२)
## ऋतुराज रंगताना

या हासऱ्या फुलांचे
हासू टिपून घ्यावे
वेलीवरी मनाला
अलवार उमलू द्यावे

आतून रंग यावे
अंगावरी रुजावे
कोशी पराग असता
वाऱ्यावरी निजावे

स्वच्छंद मंद गंध
पसरून दरवळावे
मोदात आपुल्या नादी
हुरळ हुरळ हुरळावे

फुलपाखरास थोडी
जागा दळी मिळावी
फुलराणी फुलली आहे
वनी वारता कळावी

मन माझे पुष्प व्हावे
ऋतुराज रंगताना
हरपून भान जावे
सृष्टीत दंगताना

दि.१४/०८/२०२३
दुपारी ०४.३३ वा.



## (७३)
## सांज मोहरून गेली

इंद्रधनुची कमान
दूर वनी प्रगटली
स्वप्नं सप्तरंगी होता
सांज मोहरून गेली

तिची हिरवी कंच चोळी
चाल अबोली अबोली
थोडा उजेड नि थोडी
तेजकांती की सावळी

जाता रवीचा प्रकाश
मेघातून गाळुनीया
सारे रंग उमटती
अंबराशी माळुनिया

अस्ताचली दिनमणी
रक्त रंग पांघरुनी
चांद चंदेरी चांदणं
निज अंगी गोंदवुनी

आता भरे हुडहुडी
थंडगार कुडकुडी
तिच्या कुशीत शिरावं
निशा गोड गुडगुडी

होत गुडूप रातीला
झोपाळलेली पापणी
मन अबोध जागतं
सात रंगांची झापणी

दि.१७/०८/२०२३
सकाळी ०६.३८ वा.



## (७४)
## क्षण उजळून जाती

क्षण उजळून जाती
सोन पहाटे पहाटे
देव जागविण्या येतो
तेज किती दाटे दाटे

डोंगराच्या माथ्यावर
चंदनाचा टिळा टिळा
बिंब वर वर येई
ऊब झिळमिळा झिळमिळा

गवताच्या अंगावर
शाल सोनेरी सोनेरी
कळ्या फुलं उमलती
नाना रंगेरी रंगेरी

नभ आपुल्याच नादी
रूप पालट पालट
एक संपलं की दुजं
कोडं घालत घालत

झाडं वेली तेजाळून
रोज नवं जग जग
उंच उडालं आकाशी
मन होई खग खग

दि.१८/०८/२०२३
सकाळी ०८.३८ वा.



## (७५)
## **काही उमलत्या कळ्या**

जरा विहरले मुक्तपणे मी
पंख लेवूनी जैसे
आकाशाची सीमा नव्हती
खुले हे जगणे ऐसे

पावलात मज स्पर्श मृण्मयी
हिरवळ रेशीम पसरे
मनही माझे क्षणात इकडे
चिंता जाळे विसरे

वारा येऊन उडवून लावी
झग्यासवे काळज्या
गिरक्या फिरक्या घेऊन मी ही
हवा कलिका माळल्या

दूरदूरवर नजर पोचली
सुंदर दृश्ये टिपण्या
जरा जरासे धुके पेलले
जरा उन्हा पापण्या

केश मोकळे उडले हलके
गाली कुजबुजताना
म्हणे तू सुंदर दिसशी मोहिनी
स्वच्छंदशी फिरताना

अजूनही मी जपते आहे
खुणा उरी बावळ्या
काही उमलल्या फुलांस जपणे
काही उमलत्या कळ्या
काही उमलत्या कळ्या.......

दि.१९/०८/२०२३
सकाळी ०७.३० वा.



## (७६)
## शाश्वत इथले आहे का हे

अथांगता ही हिरवी निळसर
लुभवी मनास किती दिलासा
उंच नभातून वाकून पाहे
धरतीवरती रंगीत आशा

होडी काठावरती उभी ही
जाणे वल्हव हाती आहे
गगनामध्ये माळ खगांची
आनंदाने गाती आहे

उभ्या ठाकल्या तरुवर तनुवर
एकही जरी नसे पर्णिका
जगण्यासाठी मुळामुळातून
शोषून घेतो जीवनरसिका

शाश्वत इथले आहे का हे
की सारे जणु नश्वर असते
मेघमालेतील आकारांचे
नकाश रेखे काही नसते

कधी उन्हांची तिरीप सोनेरी
कधी भरले आभाळ पेलणे
कधी सुखाची झाल पांघरून
कधी दुःखाचा जाळ झेलणे

दि.२६/०८/२०२३
सायं ०६.२६ वा.



## (७७)
## अशा ऋतूची कर आळवणी

रिमझीम रिमझीम पाऊस धारा
कुठे कोसळती शीतल गारा
बेधुंदीच्या धुंदीमध्ये
नाचत वाहत सुटतो वारा

कुठे कोणते राग भरातून
मनमोहन हा सूर ताडीतो
वेणु वाजे गोड स्वरांनी
मल्हाराची तान छेडितो

मनमोराचा फुले पिसारा
वर्षारागी हर्षची सारा
जलधारांनी काळीज पाणी
मातीमधला गंध फवारा

अशा ऋतूची कर आळवणी
जल मेघांचे मोतीय गाणी
पाणी स्वर्गातील अवतरते
भिजुनी भिजवुनी जाते आणि

असे असावे सुख हे सुखाचे
नाद वेगळा छंद आगळे
ओलीत्याच्या ओळींमधले
गाव पावसी भिजते सगळे

दि.३१/०८/२०२३
सकाळी ०८.३२ वा.



## (७८)
## कुठला शिक्षक असेल तो की

कुठला शिक्षक असेल तो की
जो पक्ष्यांना उडान देई
घरट्यामधुनी आभाळाला
जो मोजण्याची मुदान देई

कुठला शिक्षक असेल तो की
बीजा सांगे अंकुरण्याला
जिथे उन्हाचे तोंड दिसावे
तिथेच तगवून तरारण्याला

कुठला शिक्षक असेल तो की
पुष्प कळीचे उमलून येई
कसे कोणत्या वेळी खुलावे
रंग आकारा कैसे येई

कुठला शिक्षक असेल तो की
झऱ्या झऱ्याला वाहणे देई
नदी सागरा कशी शोधते
कुठून खाली धबधबाही येई

कुठला शिक्षक असेल तो की
चराचराला कळणे शिकवी
कुठली शाळा कसले पुस्तक
कसे तो सगळ्यां वळणे शिकवी

कुठला शिक्षक असेल तो की
मनी जीवनी अढळ असा
देण्यासाठी सदा सज्ज अन
हात तयाचा सढळ असा

दि.०५/०९/२०२३
रात्री ०९.३७ वा.



## (७९)
## कोरडा ठक्क श्रावण

आज बरसल्या आभाळाचे
काय बिनसले न ठाऊक
उठण्या आधीच रपरप त्याची
बरसून गेली घाऊक

थांबेना तो काही केल्या
का रागावून गेला
की माणसाची पाहुन नियत ही
अती भांबावून गेला

कळेना त्याला कसा हा माणूस
निसर्गा गिळतो आहे
देह स्वच्छ अन सुंदर करता
आतून मळतो आहे

कधीही कसे ते त्याचे वागणे
जसे बेभरवश्याचे
जरा जरासे आपण वागू
म्हणून झडणे पावसाचे

इतका जाईल कोसळून की
ठप्प आजची दुनिया
असे वाटता गुडूप जाहला
कुठे बसला दडूनिया

नको असे रे वागू तूही
कोरडा ठक्क श्रावण
भादव आला तोंडावरती
कर बरसाती पावन

दि.७/०९/२०२३
रात्री १०.३३ वा.



## (८०)
## आस मधुरल्या क्षणांची

अशा उमलल्या बागेमधले
क्षण ते तुझे नि माझे
आजही प्रिया आठवते ना
सांज सुरावट गाजे

किंचित हलकी लाटांची ती
कुजबुज तळ्यात चाले
घरट्यामध्ये माय पक्षिणी
दाणे पिलांस घाले

तिथून आला गुंजारव बघ
कभिन्न मिलिंद नाचे
फुलभोवती कसल्या ओळी
प्रीतलेख जणू वाचे

सावल्या जरा ढळल्या आता
संध्या अवतरलेली
तुझी नि माझी जवळीक वेड्या
तशात मंतरलेली

सैर कितीदा झाली व्हावी
उपवन उद्यानांची
तुला सांगते आजही मला
आस मधुरल्या क्षणांची
आस मधुरल्या क्षणांची

दि. १४/०९/२०२३
सायं ०५.५५

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष (निसर्गावरील कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(देवभक्तीपर) - नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, (राधाकृष्ण) - रूप-स्वरूप, श्रीरंग, कृष्णकांत, (प्रासंगिक) - मंगेश, आंदण, (निसर्गपर)- उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, (चंद्र) - सुधांशु, (सूर्य) - दिव्यांतरी, (प्रीत - तिच्या मनातील कविता) - नादश्रुती, श्वेता, (सकाळ-संध्याकाळ) - लाघव वेळा, (वेळा) - तेंव्हा, (प्रेम - त्याच्या मनातील कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - अलवार, मधुश्री, सहा सोहळे, (फुले) - अळुमाळु, सुरभी, (पशु) - खाणाखुणा, (पक्षी) - वैष्णवी, (स्त्रीजीवन) - स्वामिनी, मृणालिनी, (धरती-आकाश) - प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) -श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे "साहित्य रत्न" पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/ 7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924 672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/ InfoVidarbha/status/ 1418559733921816 580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री – डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/ VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT LxInwuJc ; https:/ youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/ m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ४७
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ५६
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •